जा. क्र. उमाशि १ । पु.वि । अनुदान। आदेश । १९९८ ९४६२२
विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १ याचे कार्यालय
दिनांक : 30 NOV 1998

प्रति,

प्राचार्य । मुख्याध्यापक

न्यू इंग्लिश स्कूल, संगमनेर
ता. भोर, जि. पुणे

विषय : सन १९९८ ।९९ या वर्षी किंवा तत्पूर्वी अनुदानित माध्यमिक शाळा । महाविद्यालयांना जोडून मंजूर केलेले इयत्ता ११वी । १२वी चे वर्ग । तुकडया सन १९९८।९९ या शैक्षणिक वर्षापासून अनुदानावर मंजूर करण्या बाबत

संदर्भ : संचालनालयाकडील पत्र क्रमांक एचएससी ।१३९८।९८।९९ अनुदान । १२ एचएस, दिनांक : २०।११।९८

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास पुढील अटीची पूर्तता करण्याच्या अटीवर खालीलप्रमाणे विनाअनुदानित वर्ग सन १९९८।९९ पासून अनुदानावर मंजूर करण्यात येत आहेत.

| वर्ग | शाखा | वर्ग संख्या | वर्ग बिनाअनुदान मंजूरीचे वर्ष | अनुदान मान्यता वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| इ. ११वी (प्रथम वर्ष ) | कला | १(प्रथम) | १९९५-९६ | १९९८-९९ | अनुदान |
| इ. ११वी (प्रथम वर्ष ) | विज्ञान | — | | | तत्वावर |
| इ. ११वी (प्रथम वर्ष ) | वाणिज्य | — | | | मान्यता |
| इ. १२वी (द्वितीय वर्ष ) | कला | — | | | |
| इ. १२वी (द्वितीय वर्ष ) | विज्ञान | — | | | |
| इ. १२वी (द्वितीय वर्ष ) | वाणिज्य | — | | | |

अटी :

१] आपली माध्यमिक शाळा । वरीष्ठ महाविद्यालयाची शाखा सन १९९७। ९८ या वर्षापासून किंवा त्यापूर्वीपासून १०० टक्के अनुदानप्राप्त आहे. नसल्यास उपरोक्त प्रमाणे दिलेली अनुदानमान्यता रद्द समजण्यात यावी.

२] आपल्या संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही .

......... 2...

seen
7/12/98

New English School Sangamner
Inward No....... 354
Date.... 7/12/98
File No.... 3

३] अनुदानावर आणलेल्या उपरोक्त वर्गातील विद्यार्थी पटसंख्या, सरासरी हजेरी दिनांक १४।१२।१९९० च्या शासननिर्णयातील निकषाप्रमाणे आहे.

४] इ. १२ वी चा वर्ग । तुकडी अनुदानावर आणताना इ. ११ वी चा वर्ग अनुदानावर असल्याची किंवा दोन्ही वर्ग एकाचवेळी अनुदानावर आलेले आहेत याची आपण स्वतः खात्री केलेली आहे.

५] विनाअनुदानित वर्गातील विद्यार्थ्यांकडून जमा केलेली शिक्षण शुल्काची रक्कम शासकीय कोषागारात जमा करणे किंवा वेतन अनुदानासाठी या रक्कमेचे समायोजन करणे बंधनकारक आहे व याची आपण स्वतः खात्री केलेली आहे.

६] सदर वर्ग पुणे विभागातील । महाराष्ट्रातील अतिरिक्त शिक्षकांना समावेशीत करण्याच्या अटीवर अनुदानावर मंजूर केले आहेत.

७] सदर वर्ग हे सन १९९८।९९ या शैक्षणिक वर्षापासूनच अनुदानावर आणण्यात आलेले आहेत. त्यापूर्वीची थकबाकी देय नाही.

८] सदर वर्गावर नेमलेल्या शिक्षक । शिक्षकेतर कर्मचा-यांची मान्यता घेण्यासाठी या कार्यालयास उलटटपाली प्रस्ताव सादर करावा. प्रस्तावासोबत जनरल रजिस्टर, प्रवेशित विद्यार्थ्यांचे शाळा सोडल्याचे मूळ दाखले व विद्यार्थी उपस्थितीपत्रके पटपडताळणीसाठी सादर करावीत. सन १९९८ । ९९ या शैक्षणिक वर्षातच वेतनअनुदान खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी.

स्वाक्षरित शि. उ. सं. यांची
सही असे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १ करीता

प्रतीलिपी : मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य , पुणे १

प्रतीलिपी : शिक्षण अधिकारी [माध्यमिक] जिल्हापरिषद
पुणे । सोलापूर । अहमदनगर । रायगड अलिबाग
यांना माहिती व जरूर त्या त्वरीत कार्यवाहीसाठी

Scanned with OKEN Scanner